मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३६३१/०२

श्री. संजय यल्लप्पा चौधरी,
फिलिपा बिल्डिंग घर नं.१३, -- अपीलकार
आझाद रोड, के/इस्ट वॉर्ड जवळ,
गुंदवली, अंधेरी (इस्ट)मुंबई ६९

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी -- उत्तरवादी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन,
पुणे- ४११००१

-विवेचन-

श्री. संजय चौधरी यांनी आयोगाकडे दि.१६.८.२००८ रोजी सादर केलेल्या अपिलाची सुनावणी दिनांक ५.२.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराचा जो माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गतअर्ज आहे त्यात त्यांना माहितीच्या बाबींचा उल्लेख नसून, त्यांना जे सर्टिफिकेट ऑफ व्हॅलिडिटी देण्यांत आलेले आहे. त्यात जातीच्या प्रमाणपत्राची तारीख चुकीची टाकण्यांत आलेली आहे ती दुरुस्त करुन मिळावी असे त्यांचे म्हणणे आहे व या संदर्भात सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पुणे विभाग यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

श्री. संजय यल्लाप्पा चौधरी रा.फिलीपा बिल्डिंग, घर नं.१३ बी.एम.सी. जवळ, के वॉर्ड (पूर्व) गुंडीवली, अंधेरी (पूर्व) गुंडीवली, अंधेरी (पूर्व) मुंबई-६९ यांचे अपिल क्रमांक ३६३१/२००९ प्रकरणी सुनावणी दिनांक ५.२.२००९च्या संदर्भात सादर करण्यांत येते की, श्री. संजय यल्लापा चौधरी यांना या कार्यालयाने ०६९७ दि.३१.५.१९९७ रोजी वैधता प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर वैधता प्रमाणपत्रावर त्यांच्या जातीच्या दाखल्याचा दिनांक रकानामध्ये २/१/१९९५ ऐवजी २१.१.१९९५ अशी तारीख नजरचुकीने टंकलिखीत झाली आहे. सदर दुरुस्तीकामी अपिलकर्ता यांनी सदरहू बाब या समिती कार्यालयाकडे तब्बल ११ वर्षानी माहिती अधिकार २००५ अर्जांतर्गत निदर्शनास आणून दिलेली आहे. माहिती

**अधिकारी यांचे पत्र दि.१६.५.२००८ व अपिलीय अधिकारी यांचे पत्र दिनांक २१.७.२००८ अन्वये अपिलाकर्ता श्री. संजय यल्लाप्पा चोधरी यांना त्यांचे मूळ जमातीचे प्रमाणपत्र व मुळ वैधता प्रमाणपत्रांच्या प्रतिसह कार्यालयीन वेळेत त्यांचे सोयीनुसार उपस्थित रहावे व आपल्या वैधता प्रमाणपत्रातील काही तांत्रिक चुका झाल्या असल्यास त्याची समक्ष पहाणी करुन दुरुस्त्या करुन देण्यांत येईल किंवा आवश्यकता भासल्यास शुध्दीपत्रक निर्गमित करण्यांत येईल व त्यांना योग्यते सहकार्य करण्यांत येईल असे कळविले आहे. सदरची बाब प्रशासकिय असताना त्यांनी माहिती अधिकारी २००५ अंतर्गत आपणाकडे अपिल सादर केलेले आहे.**

**या समिती कार्यालयामध्ये माहिती अधिकारी श्री.टि.आर.धोंडगे, वैद्यकीय रजेवर असून अपिलीय अधिकारी श्री.ए.डी.शेजाळे यांच्या वडिलांचे दि.३१.१.२००९ रोजी आकस्मिक निधन झाल्याने ते अर्जित रजेवर असल्याने या कार्यालयाचे कनिष्ठ प्रशासकिय अधिकारी श्री.अ.व.हंकारे हे दि.५.२.२००९ रोजीच्या सुनावणीस मूळ नस्तीसह उपस्थित राहत आहेत.**

**तरी आपणांस विनंती करण्यांत येते की, श्री. संजय यल्लापा चौधरी यांचे अपिल प्रकरण या कार्यालयाकडून आवश्यकत्या दुरुस्त्या/शुध्दीपत्रक निर्गमित करुन देण्यांत येईल. तरी श्री.चौधरी यांचे माहिती अधिकार २००५ अंतर्गत केलेले अपिल ही प्रशासकीय कामातील बाब असल्याने निकाली काढण्यांत यावी हि विनंती.**

**उपरोक्त निवदनाची प्रत अर्जदाराच्या प्रतिनिधीसही देण्यांत आलेली आहे. त्यामुळे त्यांचे समाधान झाले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

## आ दे श

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ५ फेब्रुवारी २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६३४/०२**

**श्री. मकरंद डी.सुगावकर -- अपिलार्थी**
**१ श्री. निकेतन सीएचएस लि.**
**मॅडोना कॉलनी, एस.व्ही.पी.रोड**
**सेंट फ्रान्सिस तंत्र विद्यालय जवळ**
**बोरीवली (प),मुंबई ४०० ०१०३**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी -- उत्तरवादी**
**संचालक उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पुणे-१**

**-विवेचन-**

**श्री. मकरंद डी. सुगावकर यांनी आयोगाकडे दि.९.९.२००८ रोजी दिलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक ५.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे त्यांना तपासणीसाठी कागदपत्र उपलब्ध करुन देण्यांत आले होते. परंतू तपासणीची आवश्यकता नसल्याचे अपिलीय प्राधिका-याने सांगितले. माहिती देताना नस्ती मधील पान क्रमांक बदलून माहिती देण्यांत आली असल्याचा आरोप अपिलकाराने केलेला आहे. सदर आरोप उथळ व पूर्वग्रहदुषित असून अशा प्रकर घडलेला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या आयोगास सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटलेले आहे. नस्तीमध्ये जे कागदपत्र उपलब्ध आहेत त्या कागदपत्राच्या अपिलाकाराच्या समक्ष छायांकित प्रती काढून पुरविण्यांत आलेल्या आहेत व त्या मिळाल्याबाबत अपिलाकाराने स्वाक्षरी केलेली आहे.**

**अपिलार्थी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणताही कसूर झालेला दिसून येत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक ५ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६३५/०२**

**श्री. मकरंद डी.सुगावकर -- अपिलार्थी**
**१ श्री. निकेतन सीएचएस लि.**
**मॅडोना कॉलनी, एस.व्ही.पी.रोड**
**सेंट फ्रान्सिस तंत्र विद्यालय जवळ**
**बोरीवली (प),मुंबई ४०० ०१०३**

**विरूध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहसचिव**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंब**

**जन माहिती अधिकारी, कक्ष अधिकारी -- उत्तरवादी**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई**

**-विवेचन-**

**श्री. मकरंद डी. सुगावकर यांनी आयोगाकडे दि.१०.९.२००८ रोजी दिलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक ५.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदार यांनी त्यांच्या नियुक्तीबाबत अनेक अपिले आयोगाकडे केलेली आहेत त्यापैकी हे एक अपील आहे. अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार दि.१३ जानेवारी २००८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास शासकिय व अशासकिय अनुदानित महाविद्यालयात पुर्णवेळ व अंशकालीन अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीसाठी लागू असलेले निकष आणि वेतनासंदर्भातील अर्थसंकल्पीय तरतूद विषयक माहिती दिलेली आहे.**

**अपिलीय अधिकारी यांनी ती माहिती देण्यास उशिर केलेला आहे, याची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी त्यांनी घ्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक ५ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/ ३६६७/०२

श्री.अरविंद शांतवन नवगिरी -- अपिलार्थी
सचिन बॉम्बे ट्रक ॲन्ड बुक सोसायटी
२१ हजारीमल सोमानी मार्ग,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त
परिमंडळ-२, नागपाडा,
मुंबई ४०० ००८

जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे. रोड,
नागपाडा,मुंबई ४०० ००८

-विवेचन-

श्री. अरविंद शांतवन नवगिरी यांनी आयोगाकडे दि.१०.१०.२००८ रोजी अपील सादर केलेल्या अपीलाची सुनावणी दिनांक ६.२.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी तसेच संबंधित पोलिस स्टेशनचे अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:-

केंद्रिय माहिती अधिकार २००५ अन्वये अपिलार्थी बॉम्बे ट्रॅक ॲन्ड बुक सोसायटी यांनी नमुद केल्याप्रमाणे त्यांचा संदर्भ क्र.९ चा अर्ज दि.२२.५.२००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. संबंधित अर्जास अनुसरुन तत्कालीन माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त. श्री. मि.अ.बेग, दक्षिण प्रादेशिक विभाग यांनी अपीलार्थी यांना त्यांच्या अर्जास अनुसरुन जा.क्र.११०६/सपोआ/दप्रवि/माहिती/२००८ दि.३१.५.२००८ प्रमाणे माहितीची पूर्तता करण्यांत आली असून अपीलार्थीनी ती दि.५.६.२००८ रोजी स्विकारली आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने अपीलार्थी यांनी तत्कालीन मा.प्रथम अपीलीय अधिकारी व पोलीस उप आयुक्त, पारिमंडळ-२ श्री. आर.ई.पवार यांचेकडे अपील क्र.५०/०८ विरुध्द सहाय्यक पोलिस आयुक्त व माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे.रोड, नागपाडा यांचेविरुध्द दि.१.७.२००८ रोजी अपील दाखल केले. यानंतर दि.१६.७.२००८ रोजी ठिक १६.०० वा. अपीलार्थी यांना सुनावणीसाठी बोलविण्यांत आले होते. सदर सुनावणीकरिता तत्कालीन पोलिस निरिक्षक व सहाय्यक माहिती अधिकारी

**श्री.वाकळे हे सुध्दा हजर होते. सदर अपीलावर तत्कालीन प्रथम अपील अधिकारी व पोलिस उप आयुक्त परिमंडळ-२ यांनी जा.क्र.२६२८/पोऊआ/परि.२/०८ दि.१७.७.२००८ अन्वये अपील अर्ज निकाली काढला व अपीलार्थीना केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ भाग-५ कलम १९ अन्वये वेळेत निकाली काढण्यांत आलेल्या अपीलाच्या आदेशाची प्रत पुरविण्यांत आली होती.**

**सदर अपील आदेशात अपीलार्थी यांना देय असलेली माहिती प्राप्त करुन देण्याबाबत आदेश पारित करुन अपील निकाली काढण्यांत आलेले होते.**

**सदर अपील आदेशावरुन जा.क्र.१४०३/सपोआ/दप्रावि/माअधि/०८ दि.१८.७.२००८ रोजी अन्वये माहितीची पूर्तता तात्काळ करण्याकरिता कळविण्यांत आलेले होते. परंतू अद्यापपर्यत सदर आदेशाची पूर्तता वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आझाद मैदान पोलिस ठाणे यांचेकडून करण्यांत आलेली नाही.**

**तसेच आपल्या कार्यालयातून अपीलाच्या सुनावणीस हजर राहणेबाबत कळविण्यांत आलेवरुन वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आझाद मैदान पोलिस ठाणे यांना जा.क्र.२०४/सगोआ/दप्रावि/माहिती/०८ दि.३.९.२००९ रोजी अन्वये अपीलार्थी यांना आपल्या अपीलात नमूद केलेल्या मुद्दयाबाबत व प्रथम अपीलाची पूर्तता अद्यापपर्यत का करण्यांत आली नाही. याबाबत विचारणा करण्यांत आलेली आहे. त्याप्रमाणे स्पष्टीकरण लेखी स्वरुपात सुनावणीच्या वेळेस संबंधित अधिका-यासह घेऊन येण्यास कळविण्यांत आलेले आहे.**

**संबंधित पोलिस स्टेशन यांच्या अधिका-यानी असे सांगितले की, वादातील मुद्दा हा दिवाणी व न्याय प्रविष्ठ असल्यामुळे पोलिस स्टेशनमध्ये कार्यवाही करता येत नाही. जर अर्जदारास विरुध्द पार्टीने न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन करीत आहे असे वाटत असेल तर ती बाब त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणावी व त्याची एक प्रत पोलिस स्टेशनला द्यावी म्हणजे पोलिस स्टेशन त्याबाबत कार्यवाही करु शकेल. उपलब्ध माहिती देण्यात कसूर केलेला नसल्याने पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ६ फेब्रुवारी २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३६७६/०२

श्री. मो.शरिफ अब्दुल हमीद बागबान -- अपिलार्थी
१०/१२ साबू सिध्दीकी रोड, दिलखुश मंजील
४ था मजला, रुम नं.ञ २७, मुंबई ०१

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त
परिमंडळ-२, नागपाडा,
मुंबई ४०० ००८

जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे. रोड,
नागपाडा,मुंबई ४०० ००८

-विवेचन-

श्री. मो.शरिफ अब्दुल हमीद बागबान यांनी आयोगाकडे दि.१७ ऑक्टोंबर २००८ रोजी जे व्दितीय अपील सादर कले त्याची सुनावणी दि.६.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराच्या अपीलाबाबत संबंधित वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केलेले आहे :-

अर्जदार श्री. मोहम्मद शरीफ अब्दुल हमीद बागबान यांनी माहिती अधिकार अध्यादेशान्वये दि.८.३.२००७ रोजी गैर अर्जदार श्रीमती फरीदा व कस्तुरी यांचे संदर्भात झालेल्या घटनेबाबत दि.८.३.२००७ रोजी ठाणे दैनंदिनीमध्ये घेतलेल्या नोंदीची ठाणे दैनंदिनी प्रत मागितलेली आहे.

सदर ठाणे दैंनदिनी गहाळ झाल्याबाबतच्या अभिलेखाचे अर्जदारांना निरीक्षण करण्यासाठी त्यांचे सोयीनुसार कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत पोलिस ठोण्यात येण्याबाबत कळविण्यांत आलेले होते. परंतू अर्जदार निरीक्षणासाठी पोलिस ठाण्यात आलेले नाहीत.

ठाणे दैनंदिनी संरक्षित करण्यासंबंधीचे रुल्स/प्रोसीजरबाबतची माहिती अर्जदाराने मागितलेली होती. परंतू सदरची माहिती ही गोपनीय प्रकाशन केवळ विभागीय उपयोगासाठी असे अंकीत केले असल्याने ते अर्जदारास देण्याबाबत योग्य तो विचार व्हावा अशी विनंती आहे.

यातील अर्जदाराना मुळतः दि.८.३.२००७ रोजी झालेल्या घटनेसंदर्भात ठाणे दैनंदिनमध्ये घेतलेल्या नोंदीची माहिती पाहिजे आहे. परंतू सदर घटनेबाबतच्या पोलिस ठाण्यात अदखलपात्र गु.र.क्र.३४६/०७ कलम ५०४ ५०६ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यांत आलेला आहे व सदर अदखलपात्र गुन्हयाची प्रत अर्जदारांना यापूर्वीच देण्यांत आलेली आहे."

तरी अर्जदाराने मागितलेल्या ठाणे दैनदिनीची शोध लागल्यानंतर अर्जदारांना आवश्यक असलेली माहिती तात्काळ पुरविण्यांत येईल.

ठाणे दैनंदिनी संरक्षित करण्यासंबंधचे रुल्स/प्रोसीजरबाबतची माहिती ही गोपनीय असल्यामुळे व अशा प्रकारची माहिती जनतेला देणे हे योग्य होणार नसल्याने ती माहिती न देण्याचा निर्णय कायम करण्यांत येत आहे. मात्र दैनंदिनी गहाळ झाल्यानंतर व त्याचा शोध घेऊन दैनंदिनी प्राप्त होत नसल्याबद्दल संबंधित उपायुक्त यांनी याबाबत चौकशी करुन दैनंदिनी गहाळ होण्यास जे जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द खातेनिहाय कार्यवाही करावी. या व्यतिरिक्त सर्व माहिती अर्जदारास दिलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

## आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

या आदेशाची प्रत आयुक्त (पोलिस)परिमंडळ-२ मुंबई यांनाही देण्यांत यावी.

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक ६ फेब्रुवारी २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६६९/०२**

**श्री. अेस.अेम. मुशर्रफ शम्सी** **-- अपिलार्थी**
बी-३ मीरा पार्क, गीता नगर
**मीरा-भाईदर रोड, पुराना पेट्रोल पंपच्या मागे,**
**मीरा रोड, पूर्व जि.ठाणे**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी**
**मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळ,**
**२ रा मजला, डी.डी.बिल्डिंग, जुने जकात घर,**
**श.भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ०२३**

**-विवेचन-**

**श्री. अेस.अेम. मुशर्रफ शम्सी यांनी आयोगाकडे दि.१०.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले त्याची सुनावणी दि.६.२.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ यांनी दिलेली आर्थिक मदतीबाबतची माहिती पाहिजे होती व ही माहिती घेऊन जाण्यासंबंधी अर्जदारास कळविण्यांत आले होते. परंतू अर्जदाराचे म्हणणे असे की, त्यांना त्या कार्यालयात जाऊनही माहिती मिळालेली नाही. अर्जदारास एक महिन्यात आत कळविलेले नसल्यामुळे अर्जदारास हवी असणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आणलेली आहे. ती माहिती अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी, असे निर्देश देण्यांत आले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतलेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि.९.२.२००९ रोजी प्रत्यक्ष येऊन खुलासा सादर करावा असे निर्देश देण्यांत आलेले आहेत. अर्जदारास माहिती घेऊन जाण्यास कळविण्यांत ७ दिवसाचा विलंब झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर २५०X७ - रु.१७५० इतकी शास्ती लादण्यांत येत आहे. ती मार्च महिन्यात देण्यांत येणा-या पगारातून वसूल करुन शासकिय परिपत्रकात दर्शविलेल्या बजेट हेड खाली जमा करावी व तसे केल्याचा अंमलबजावणी अहवाल आयोगास सादर करावा.**

आ दे श

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे. संबंधितंनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक ६ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६६८/०२**

**श्री. बाबुभाई एम. बडिया** **-- अपिलार्थी**
**गोयल प्रॉपर्टीज प्रा.लि.**
**४०८ प्रगती शॉपिंग सेंटर,**
**दप्ती रोड, मालाड पूर्व मुंबई ४०० ०९७**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा डायरेक्टर (इएस ॲन्ड पी)**
**बृहन्मुंबई मनपा विस्तारीत इमारत**
**३ रा मजला, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी, मुख्य अभियंता (विकास नियोजन)** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगर पालिका, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१**

**-विवेचन-**

**श्री. बाबुभाई एम. बडिया यांनी आयोगाकडे दिनांक १.९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले तयाची सुनावणी दि.६.२.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थीस म्युनिसिपल स्कुल, पार्किग, हॉस्पीटल,ना विकास क्षेत्र, पी.जी. आर.जी. इत्यादि भूखंडावरील आरक्षण बदलणे किंवा वगळणे या संबंधीची १९९१ सालापासून संपूर्ण बृहन्मुंबईची माहिती पाहिजे आहे.**

**ही माहिती गोळा करावयास फार मोठया प्रमाणावर मनुष्यबळ खर्च पडेल म्हणून माहिती नाकारण्यांत आली.**

**सुनावणीच्या वेळी सर्व सबंधितांशी चर्चा केल्यानंतर अर्जदाराने त्यांना पी- साउथ व पी- नॉर्थ वार्ड ची माहिती दिली तरी चालेले असे प्रतिपादन केले.**

**त्याप्रमाणे या वॉर्डबाबत माहिती १ महिन्याचे आंत अर्जदारास द्यावी.**

**आ दे श**

**अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. संबंधितंनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक ६ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३६७८/०२

श्री. प्रदीप प्यारेलाल दुग्गल -- अपिलार्थी
१०२, ओशिएन व्हयू युनियन पार्क, पाली हिल
खार पश्चिम मुंबई ५२

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त
मुख्यालय-१ मुंबई -१

जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी
मुख्यालय-१ मुंबई -१

-विवेचन-

श्री. प्रदीप प्यारेलाल दुग्गल, यांनी आयोगाकडे दि.६.१०.२००८ रोजी सादर केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ७.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराचे रिव्हॉलवरचे लायसन्स १९९४ साली जप्त करण्यांत आले होते व त्यांचे लायसन्सही रद्द करण्यांत आले होते. या संदर्भात दिलेले कारण व केलेली कृती ही योग्य नाही असे दर्शवून त्या संदर्भात श्री.दुग्गल यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त यांच्याकडे माहिती मागितली होती. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे जे प्रथम अपिल सादर केले होते त्या अपिलाचे आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

शासकिय माहिती अधिकारी व श्री. प्रदिप प्यारेलाल दुग्गल यांचे युक्तीवाद ऐकल्यानंतर असे निदर्शनास येते की, शासकिय माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती योग्य आहे. १. शासकीय माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाप्रमाणे अर्जदार यांच्या विरुध्द सांताक्रुझ पोलिस ठाणे येथे गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच अर्जदारानी शासकीय माहिती अधिकारी पश्चिम प्रादेशिक विभाग यांचेकडून त्यांचा शस्त्र परवाना रद्द केल्याबाबतच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेतलेल्या आहेत. २. सदर प्रकरणांची कागदपत्रे तपासली असता असे दिसुन येते की, पोलीस आयुक्तालयाने श्री.प्रदिप प्यारेलाल दुग्गल यांचा शस्त्र परवाना रद्द केला होता त्याविरुध्द त्यांनी शासनाकडे अपिल केले होते व सदरचे अपिल शासनाने फेटाळले आहे. अर्जदारांनी त्यांच्या शस्त्र व काडतुस जप्त करण्याची कारणे का? अशी विचारणा केली आहे त्याबाबत त्यांना पूर्वीच म्हणजे दि.३१.१२.१९९४ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. त्या कारणे दाखवा नोटीसची प्रत त्यांनी माहिती अधिकारांतर्गत मागितलेली नसुन वरीलप्रमाणे शस्त्र जप्त करण्याचे व परवाना रद्द करण्याचे

कारण विचारले  असल्याने सदरच्या विषयाची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये समाविष्ट करणे योग्य नाही. अर्जदारानी कार्यालयातील कोणत्याही प्रकारचा अभिलेख मागितला नसल्याने सदरच्या विषयाची माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २ (च) प्रमाणे आवश्यक नाही.  अर्जदाराने शस्त्र जप्त केल्याबाबत व परवाना रद्द केल्याबाबत शासनाकडे अपिल दाखल केले होते. ते शासनाने फेटाळलेले आहे.  त्यामुळे अर्जदाराने त्यांचा रद्द केलेला शस्त्र परवाना व जप्त केलेलेशस्त्र व काडतुस याबाबत योग्य त्या न्यायालयाकडे दाद मागावी. सदरचे अपिल निकाली काढलेले आहे.

अर्जदाराने व्दितीय अपिलाची जी कारणे दिली आहेत ती व त्यास अपिलीय अधिकारी  यांनी खालील प्रमाणे खुलासा केलेला आहे :-

अर्जदाराने व्दितीय अपिलाची दिलेली कारणे पुढीलप्रमाणे :-

**Did not get justice, because (a) The first Appellate Officer, before passing the order, did not bother to find out about the present where abouts of my costly and imported revolver and its 19 bullet. (b) Also did not verify or cross check the grounds on which the show cause notice was issued were true or false. (c) Did not make inquiry or investigation as to whether by any chance my name appears to be the accused in the alleged to I.P.C. cases registered against me at S'cruz p. stn. (d) Did not try to ascertain as to whether the grounds or reason quoted in the show cause notice were sufficient to cancel and confiscate my revolver because except for to N.C. complaints registered against me, I have not been involved in any of the single offence.  I have right to seek information as to why, API Avad and Sr.  Police Inspector B.N. Chougule were not called and questioned for submitting totally false report to D.C.P. H.Q.1. which has resulted in cancellation or may arms license and confiscation of my revolver and 19  bullets.**

**Where is my revolver at present which was illegally confiscated by API Avad of Santacruz police stn., Mumbai.  Why I should bear huge monetary loss for illegally taking away or confiscating my arms license, my 32 bore smith and Wesson make revolver and its 19 bullets when I have proved without doubts that the reason quoted in the show causes notice were totally false and baseless, then why no one is bothering whether my contention are  true or false and my every Appellate Officer does not cross verify and give justice to me ?**

खुलासा - अर्जदार श्री. प्रदिप प्यारेलाल दुग्गल यांनी दि.२.६.२००८ च्या माहिती अधिकारांतर्गत अर्जान्वये मागणी केलेली या कार्यालयाशी संबंधित माहिती या कार्यालयाच्या जा.क्र.३४३/सपोआ/मुख्यालय १/माआ/२००८ दि.२३.७.२००८ अन्वये पुरविण्यात आलेली आहे आणि श्री.दुग्गल यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष, पश्चिम प्रादेशिक विभाग बांद्रा पश्चिम, मुंबई यांच्याकडून त्यांचा शस्त्र परवाना रद्द केल्याबाबतच्या सर्व कागदपत्राच्या प्रती प्राप्त करुन घेतलेल्या आहेत.

अपिलार्थी श्री. प्रदिप प्यारेलाल दुग्गल यांनी व्दितीय अपीलात उपस्थित केलेले (a)ते (d)मुद्दे माहितीअधिकाराशी संबंधित नाहीत. अर्जदाराला माहिती अधिकारांतर्गत देय

**ठरणारी माहिती यापूर्वीच पुरविण्यांत आलेली असून अपिलार्थीने अभिलेखावरील कोणतीही नविन माहिती मागितलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीने व्दितीय अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे हे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) व(झ) मध्ये नमुद केल्या प्रमाणे माहिती व अभिलेख या व्याख्येत बसत नवल्याने सदर मुद्दे गैर लागू आहेत अशी आमची धारणा आहे.**

**अर्जदाराचे लायसन्स रद्द करताना त्यांना कारणेदाखवा नोटीस देण्यांत आलेली होती.तसेच त्याचे यासंदर्भात अपील सुध्दा शासनाने फेटाळून लावलेले आहे. त्यामुळे या संदर्भातील सर्व कागदपत्रे त्यांना देण्यांत आलेली आहेत. त्यामुळे उपलब्ध माहिती देण्यांत कुचराई झालेली आहे असे वाटत नाही. लायसन्स रद्द करण्याची कृती किंवा शस्त्र परत न करण्याची कृती याबाबत अर्जदाराचे काही आक्षेप असल्यास त्यांनी संबंधित न्यायालयाकडे याबाबत दाद मागणे योग्य राहिल. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

## आ दे श

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ७ फेब्रुवारी २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६७९/०२**

**श्री. जगदिश एम. मुलचंदानी -- अपिलार्थी**
**बी-१०६,राहुल क्लासिक काणे कॉलेजसमोर,**
**साईबाबा नगर, बोरीवली (प), मुंबई ९२**

**विरूध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त**
**परिमंडळ १२ शैलेंद्र नगर,**
**दहिसर पूर्व, मुंबई ६८**
**जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी**
**परिमंडळ १२ शैलेंद्र नगर,**
**दहिसर पूर्व, मुंबई ६८**

**-विवेचन-**

**श्री. जगदीश एम.मुलचंदानी, यांनी आयोगाकडे दि.६.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.७.२.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अज्रदारांने दहिसर पोलिस स्टेशनकडे केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही करण्यांत आली याची माहिती मागितली होती प्रथम तक्रारीच्या बाबत अदखलपात्र गुन्हा दाखल करुन अर्जदारास न्यायालयामध्ये दाद मागणेबाबत समज देण्यांत आलेली आहे. दुस-या मुद्दयाबाबतीत सुध्दा तसेच उत्तर व ३ -या मुद्दयाबाबत अर्जदार यांच्या मुलाचे स्कुटरला अपघात झाल्याबाबत पोलिस स्टेशनला किरकोळ अपघात नोंद (T.A.D.No)क्र.१८१/२००७ अन्वये नोंद घेण्यांत आली आहे, अशा प्रकारची माहिती देण्यांत आलेली आहे. सदरची माहिती रेकॉर्डप्रमाणे आहे याचा निर्वाळाही अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१६.९.२००८ रोजीच्या आदेशात दिलेला आहे. अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तसेच कागदपत्राचे अवलोकन केले असता, अपिलीय अअधिकारी यांच्या निर्णयात बदल करावा अशी परिस्थिती दिसून येत नाही.**

**आ दे श**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक ७ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३६८०/०२**

**श्री.स.शि.तिवारी -- अपिलार्थी**
**स.शि.तिवारी गावदेवी एकता को.आ.सोसायटी**
**इमारत क्र बी-१ खोली क्र.१०६ १ ला मजला,**
**गावदेवी लिकिंग रोड, गोरेगोंव पश्चिम ,मुंबई-९०**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त**
**परिमंडळ १२ शैलेंद्र नगर,**
**दहिसर पूर्व, मुंबई ६८**

**जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी**
**परिमंडळ १२ शैलेंद्र नगर,**
**दहिसर पूर्व, मुंबई ६८**

**-विवेचन-**

**श्री. सरोजकुमार शि. तिवारी यांनी आयोगाकडे दि.६.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.७.२.२००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**संबंधित पोलिस स्टेशन यांच्या म्हणण्यानुसार याबाबतीत अर्जदाराची झोपडी काढण्याच्या बाबतीत पोलिस स्टेशनने महापालिकडे काही माहिती मागविलेली आहे. ती अजुनही अप्राप्त आहे ती प्राप्त होताच संबंधित पोलिस स्टेशनकडून कार्यवाही करण्यांत येणार आहे. सद्यःस्थितीप्रमाणे दिलेली माहिती रेकॉर्डप्रमाणे बरोबर असली तरी याबाबतीत संबंधित पोलिस स्टेशनने महापालिकडे पाठपुरावा करावा व अर्जदारास अंतिमतः योग्यती माहिती द्यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक ७ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८०७/०२

श्री.चारुहास दशरथ चोपडेकर अपिलार्थी
चोपडेकर इस्टेट, सोमाभाई पटेल चाळ,
बालाजी मंदिराच्या बाजूला कुर्ला (प)
मुंबई ४०० ०७०

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त
परिमंडळ ३, बावला कपांऊड, डॉ.बी.ए.रोड,
भायखळा पुर्व मुंबई ४०० ०१३

जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग
मुंबई ४०० ०१३

-विवेचन-

श्री. चारुहास दशरथ चोपडेकर यांनी दि.२८ ऑगस्ट २००९ रोजी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१६.२.२००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपिलाथी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास श्री.ओमप्रकाश गुप्ता आणि त्यांच्या बंधुच्या विरोधात दाखल केलेल्या तक्रारीची माहिती पाहिजे होती व संबंधित पोलिस ठाण्याशी संपर्क साधुन व त्यांचेकडून माहिती घेऊन अशा प्रकारची तक्रार दाखल करण्यांत आलेली नाही, असे उत्तर अर्जदारास देण्यांत आले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला श्री. ओमप्रकाश गुप्ता यांच्या बंधुच्या विरुध्द एक तक्रार दाखल केली असल्याचे अपिलार्थीनी सांगितले व त्यामुळे कुर्ला पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक यांना अर्जाच्या अनुषंगाने अभिलेख पडताळून सात दिवसाचे आत माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले आहेत.

**त्यानुसार अर्जदार श्री. चारुहास दशरथ चोपडेकर यांना दि.२८.१०.२००५ रोजी श्री राजेंद्रप्रसाद सुखदेव गुप्ता यांच्या विरोधात नोंद असलेला अदखलपात्र गुन्हा क्र.५०५ कलम ५०४,५०६ च्या छायांकित प्रती देण्यांत आलेल्या आहेत. त्यामुळे अर्जदारास उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ फेब्रुवारी २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८१०/०२**

**श्री.रमाकांत विश्वास शिर्सेकर --अपिलार्थी**
**डवरीनगर गेट नं.२, गणेश चाळ,**
**अलियावर जंग मार्ग, सांताक्रुज (पूर्व)**
**मुंबई ४०० ०५५**

**विरूध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त**
**परिमंडळ ९, पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे पचिम**
**मुंबई ५०**

**जन माहिती अधिकारी, सहा.पोलिस आयुक्त -- उत्तरवादी**
**परिमंडळ ९, पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे पचिम**
**मुंबई ५०**

**-विवेचन-**

**श्री. रमाकांत वि. शिर्सेकर यांनी आयोगाकडे दि.३०.९.२००८ जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१६.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी काही मुद्दयाबाबत माहिती देण्याचे निर्देश दिले होते व त्याप्रमाणे अर्जदारास माहिती देण्यांत आलेली आहे. अर्जदाराच्या मुळ अर्जात मागितलेली संपूर्ण माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. याबाबत संबंधित पोलिस अधिकारी यांच्या विरुध्द अर्जदाराच्या काही तक्रारी असतील तर त्यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिका-याकडे तक्रार करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

**आ दे श**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक १६ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८१२/०२**

**श्री.सलीम शेख** **--अपिलार्थी**
**९५ पहिला माळा, इस्ट स्ट्रीट गॅलरिया**
**२४२१,पूर्व स्ट्रीटकॅप, पुणे ४११००१**

**विरूध्द**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिति अधिकारी,** **---उत्तरवादी**
**महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई३२**

**-विवेचन-**

**श्री. सलीम शेख यांनी आयोगाकडे दि.११.११.२००८ रोजी सादर केलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दि.१६.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिति अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदारास महसूल विभागातील अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व तहसिलदार संवर्गातील नेमणुका व प्रतिनियुक्त्या तसेच ३ वर्षानंतरही प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांच्या याद्या, मंत्री कार्यालयात प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-याच्या याद्या, मंत्री कार्यालयात ३ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही बदल्या कां करण्यांत आल्या नाहीत याबाबतची माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीच्या मागणीनुसार मंत्री अस्थापनेवर नेमणूका करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या परिपत्रकाची प्रत द्यावी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देश दिले होते. त्या निर्देशानुसार अर्जदारास माहिती पुरविण्यांत आलेली आहे.**

**अर्जदारास कोणती माहिती अर्जदारास अपूर्ण वाटते याचा उल्लेख अपिल अर्जात नाही. अर्जदाराच्या विनंतीनुसार आयोगाच्या धोरणानुसार आत्यंतिक परिस्थिती शिवाय सुनावणी पुढे ढकलण्यांत येत नाही. अपिलकर्त्याची तशी विनंती मान्य करता आली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला सुध्दा अर्जदारानी ज्या मुद्दयाबाबत माहिती मागितली होती ती माहिती त्यांना देण्यांत आलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक १६ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८१३/०२

श्री.केतन मोदी --अपिलार्थी
२५/६, महावीर ३ रा मजला,
एस.व्ही.सोवानी मार्ग, मुंबई ४००००४

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता ---उत्तरवादी
(इमारत प्रस्ताव)शहर,उपमुख्य अभियंता,
ई वॉर्ड कार्यालय इमारत ३ रा मजला,
१०वा संखली स्ट्रीट,भायखळा, मुंबई ०८

जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता
(इमारत प्रस्ताव)शहर-१ उपमुख्य अभियंता,
ई वॉर्ड कार्यालय इमारत ३ रा मजला,
१०वा संखली स्ट्रीट,भायखळा, मुंबई ०८

-विवेचन-

श्री. केतन मोदी यांनी आयोगाकडे दि.१८ ऑक्टोंबर २००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केलेले आहे त्या अपिलाची सुनावणी दि.१६.२.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास श्री.वर्धमान स्थानकवासी जैन सेवा संघ यांनी डी वॉर्ड ऑफीसकडे दुरुस्ती व पुर्नबांधणीसाठी जानेवारी १९९५ मध्ये अर्ज केला होता त्या अनुषंगाने काही माहिती विचारली होती. या नस्तीचे अवलोकन करण्यास परवानगी देऊन त्या कागदपत्राच्या प्रती घेऊ शकतात असे उत्तर प्रथम अपिलाच्या निर्णयात दिलेले आहे. अर्जदाराची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहिती देता येत नाही असेही कळविण्यांत आलेले आहे व अर्जदारास वाटल्यास नस्तीचे निरिक्षण करुन कागदपत्राच्या प्रती घेऊ शकतात निर्देश अपिलीय अधिकारी यांनी दिले असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले.

ब-याचदा प्रश्नार्थक स्वरुपात असलेल्या अर्जांना माहितीच्या अधिकारात माहिती देता येत नाही असे अर्जदारास जन माहिती अधिकारी यांचे कडून कळविले जाते ते चुकीचे आहे. अशा प्रश्नार्थक स्वरुपाचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रश्नाच्या अनुषंगाने जे संबंधित कागदपत्र रेकॉर्डला असतील ते अर्जदारास उपलब्ध करुन द्यावयाचे असतात तसेच रेकॉर्डला असलेले नस्तीतील कागदपत्राचे अर्जदार निरिक्षण करु शकतात व त्यांना

**अर्जदारांना हव्या असलेल्या कागदपत्र उपलब्ध करुन द्यावयाच्या असतात. त्यामुळे अर्जदारास प्रश्नाच्या अनुषंगाने रेकॉर्डला उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रती पुरवाव्यात. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**<u>आ दे श</u>**

**अपिल मान्य करण्यांत येत आहे. अर्जदारास १० दिवसाचे आत माहिती पुरविण्यांत यावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १६ फेब्रुवारी २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८२२/०२

श्री.नूर महम्मद खत्री --अपिलार्थी
प्लॉट नं. ३४६/५,
जवाहर नगर रोड, न. १२, गोरेगांव (प)
मुंबई ६२

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त ---उत्तरवादी
मनपा पी. साऊथ वॉर्ड, मिठानगर,
म्युनिसिपल स्कूल, मिठानगर, गोरेगांव (प)
मुंबई ६२

जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता (इ.व का.)
मनपा पी. साऊथ वॉर्ड, मिठानगर,
म्युनिसिपल स्कूल, मिठानगर, गोरेगांव (प)
मुंबई ६२

-विवेचन-

श्री. नूर महम्मद खत्री यांनी आयोगाकडे दि.२३.९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले होते. त्या अपीलाची सुनावणी दिनांक १७.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारांना प्लॉट नं. १०२, जवाहर नगर, गोरेगांव पश्चिम, मुंबई येथे झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबतीत काही माहिती विचारलेली होती. अर्जदारास अगोदरच कळविण्यांत आलेले आहे की, या प्लॉटच्या मालकाला या अगोदरच बिल्डिंग प्लॅन सादर करण्याबाबत लिहिलेले आहे. सध्या त्या ठिकाणी नविन कुठचे काम केल्याचे दिसत नाही आणि अर्जदारांने अनधिकृत बांधकामाचा उल्लेख केलेला आहे ते बांधकाम नाही. सदर बांधकामाचा मंजूर प्लॅन उपलब्ध नसल्यामुळे अनधिकृत आहे किंवा नाही ठरविता येत नाही. मात्र मंजूर प्लॅन उपलब्ध होताच तसे ठरविण्यांत येईल.

वरील सर्व पत्रामध्ये असे दिसून येते की, आजच्या घटकेला बांधकामाच्या मंजूरीबाबत वॉर्ड ऑफीसमध्ये कागदपत्र उपलब्ध नाही. मात्र जी माहिती मुळ मालकाकडे मागितलेली आहे ती माहिती महापालिका इमारत नियोजन विभागाकडे असायला पाहिजे. त्यांचेकडून प्लॅन प्राप्त करुन घेऊन प्लॅनबाबत शहानिशा करु शकतात व अर्जदाराच्या

म्हणण्याप्रमाणे कोणते बांधकाम अनधिकृत आहे ते ठरवू शकतात. हया बाबतीत सहाय्यक आयुक्त तथा अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी लक्ष घालून महापालिका कायदयानुसार योग्यती कार्यवाही करावी व अर्जदारास माहिती द्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपिल मान्य करण्यांत येत आहे. सबंधितांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ फेब्रुवारी २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८२४/०२**

**श्री.जगत कांतीलाल शाह, --अपिलार्थी**
**ई-५-५, कृपा नगर, ईर्ला, एस.व्ही.रोड,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०००५६**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त ---उत्तरवादी**
**मनपा पी/उत्तर वॉर्ड, लिबर्टी गार्डन,**
**मामलतदारवाडी, मालाड पश्चिम**
**मुंबई ६४**
**जन माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता (इमारत.)**
**मनपा पी/उत्तर वॉर्ड, लिबर्टी गार्डन,**
**मामलतदारवाडी, मालाड पश्चिम**
**मुंबई ६४**

**-विवेचन-**

**श्री.जगत कांतीलाल शहा, यांनी आयोगाकडे दि.३.१२.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.१७.२.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**याबाबत अर्जदाराला व्हॅनिला तलाव, मड आयलंड एरंगल गाव मालाड पश्चिम,मुंबई येथे श्री. डिसोझा यांनी केलेले अनधिकृत बांधकामाबाबत मनपा मुंबई ॲक्ट कलम ३५१/४८८ अन्वये निर्देश देण्यांत आलेले आहे व पुढील कार्यवाही करण्यांत येत आहे असे उत्तर या अगोदरच देण्यांत आलेले आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकार अधिनियमान्वये उपलब्ध कागदपत्राप्रमाणे असलेली परिस्थिती अर्जदारास कळविण्यांत आलेली आहे. मात्र अर्जदाराचे समाधान हे अनधिकृत बांधकाम पाडून टाकल्याने होणार आहे. त्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.**

आ दे श

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ फेब्रुवारी २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८३२ /०२

श्री.निवृत्ती राजाराम बिजापूरे --अपिलार्थी
२०९/२१० आशा बिल्डिंग, पाथर्ली रोड,
गोग्रासवाडी, डोंबिवली (पूर्व)जि.ठाणे ४२१ २०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन) ---उत्तरवादी
आयुक्त दुगधव्यवसाय विकास कार्यालय,
प्रशासकिय इमारत अब्दुल गफार खान मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८

जन माहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त(लेखा)
आयुक्त दुगधव्यवसाय विकास कार्यालय,
प्रशासकिय इमारत अब्दुल गफार खान मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८

-विवेचन-

श्री. निवृत्ती राजाराम बिजापुरे यांनी दि. ८.१२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले त्याची सुनावणी दि.१८.२.२००८रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार हे स्वतः दुग्धव्यवसाय विकास कार्यालयात अधिकारी पदावर काम करीत आहेत. त्यांनी विचारलेली माहिती ही त्यांची बिले व प्रशासकिय बाबीशी संबंधीत आहे. त्याचा जन हिताशी काहीही संबंध नाही, असे जरी असले तरी त्यांच्या प्रत्येक मुद्याबाबत रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्यांत आलेली आहे. अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा आदेश पारित केलेले आहेत. तसेच त्यांच्या काही रक्कमा अदा व्हावयाच्या आहेत, त्याबाबत सुध्दा कार्यवाहीचे निर्देश दिलेले आहेत. अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या आदेशानुसार माहिती देण्यास कुचराई केलेली दिसत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक १७ फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/ ३८२७ /०२

अपील क्रमांक २००९/ ३८२७ /०२

श्री.शेखर काशिनाथ एल. कापुरे --अपिलार्थी
५९,आंबेडकर सदन.
करी रोड, मुंबई ४०० ०१३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त ---उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बी.अेरोड.परळ नाका,
परेल मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी, वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
(दुकाने व आस्थापना)
एफ/दक्षिण विभाग कार्यालय,
डॉ.बी.अे.रोड.परळ नाका,
परेल मुंबई ४०० ०१२

## -विवेचन-

श्री.शेखर काशिनाथ एस.कापुरे यांनी आयोगाकडे दि.२०.११.२००८ रोजी दोन अपिले सादर केली होती. त्याची सुनावणी दि.१७.२.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी यांच्या वतीने श्री.सूर्यकात केशव शिंगे हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास युनीट क्र.५/६ टी.के.इंडस्ट्रियल शिवडी या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या गारमेंट कंपनीची बी.एम.सी. ॲक्ट ३९४ कलमाखालील लायसेन्ससाठी केलेला अर्ज व त्याबरोबर जोडलेली कागदपत्रे व इतरही काही माहिती मागितली होती.

गारमेंट व्यवसाय हा मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत येत नसून कारखाने अधिनियमांतर्गत येत असल्यामुळे सदर बाबतीत दुकाने व आस्थापना विभाग माहिती देऊ शकत नाही असे अर्जदारास कळविण्यांत येऊन हाच निर्णय अपिलीय अधिकारी यांनी कायम केला व तोच निर्णय आयोगापुढील अपीलात सुध्दा कायम करण्यांत येत आहे.

**वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञाप्ती विभागाकडे अर्जदाराने जो अर्ज केला होता त्याबाबतीत अर्जदारास माहिती दिलेली आहे. गेल्या अनेक वर्षापासून लायसन्स नुतीनीकरण करुन दिलेले आहे त्याची माहिती दिली आहे. मात्र मुळ अनुज्ञाप्ती ही अनेक वर्षापूर्वीची (१९९२ ची)असल्यामुळे त्यांचे कागदपत्र शोधून काढणे जिकरीचे काम आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. फक्त तेवढया अनुज्ञाप्ती व त्या सोबतची कागदपत्रे अर्जदारास देता आली नाहीत कारण १५ ते १६ हजार अनुज्ञाप्ती या प्रकारच्या आहेत. असे जरी असले तरी अर्जदारास माहिती देण्याच्या दृष्टीने तरी १९९२ सालच्या रेकॉर्ड बघुन त्यांना जे कागदपत्र हवी असतील ते देण्याचा प्रयत्न करावा असे निर्देश देण्यांत आले.**

आ दे श

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञाप्ती यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे १५ दिवसांत कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक १७ फेब्रुवारी २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००९/ ३८८७ /०२**
**अपील क्रमांक २००९/ ३८८८ /०२**
**अपील क्रमांक २००९/ ३८८९ /०२**

**श्रीमती अफताफ अे सिध्दीकी --अपिलार्थी**
**बी/४ सदानंद क्लासिक,**
**प्लॉट नं. ५२८, ३३ रा रोड,**
**खार (वेस्ट),मुंबई ५२**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त ---उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.बी.अेरोड.परळ नाका,**
**परेल मुंबई ४०० ०१२**

**जन माहिती अधिकारी, वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ/दक्षिण विभाग कार्यालय,**
**डॉ.बी.अे.रोड.परळ नाका,**
**परेल मुंबई ४०० ०१२**

**-विवेचन-**

**या तिन्ही अपिलाची सुनावणी दि.१८.२.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थीना माहिती देण्यांत आलेली आहे व त्यांनी संबंधित नस्तीची पाहणी सुध्दा केलेली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार कार्यकारी अभियंता कार्यालयाने पाठविलेली काही पत्र या नस्तीमध्ये दिसत नाहीत त्यामुळे ते कागदपत्र देण्यांत आलेले नाहीत. तेव्हा अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, दि.२८.२.२००९ पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराची कार्यकारी अभियंता कार्यालयास भेट निश्चित करावी व सदरील विषयावरील त्या कार्यालयातील नस्त्या तयार ठेवण्यांत याव्यात व अर्जदारानी नस्तीचे अवलोकन करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांना देण्यांत याव्यात.**

**आ दे श**

**वरील तिन्ही अपिले निकाली काढण्यांत येत आहेत. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक १७फेब्रुवारी २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

फेब्रूवारी २००९ मराठी-१